**निवडणूक आचारसंहिता कालावधीत**
**पिण्याचे पाणी पुरवठा कार्यक्रमांतर्गत**
**घेण्यात येणाऱ्या योजनांची अंमलबजावणी**

BUMIS 01 | 81

**महाराष्ट्र शासन**
**पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग,**
**शासन परिपत्रक क्र.ग्रापापु.१००४/प्र.क्र.३५/पापु.०७,**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक:-१९ मार्च, २००४**

वाचा:-

१) निवडणूक आयोग यांचे पत्र क्र.४३७/६/एसटी/९६: PLN III/ ४७८२, दि.३ मे,१९९६ चे पत्र
२) शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, क्र.ग्रापापु.१०९६/सीआर-१२१०/पापु.०७, दिनांक ८ मे, १९९६
३) शासन पत्र, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र.ग्रापापु-१०९६/सीआर-१२१०/ पापु.०७, दिनांक ३० सप्टेंबर, १९९६
४) शासन अधिसूचना, ग्राम विकास व जलसंधारण विभाग क्र.झेडपीए-१०९७/सीआर-१९०२/३३, दिनांक १३ फेब्रुवारी, १९९७
५) शासन परिपत्रक, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग क्र. संकीर्ण.१०९८/प्र.क्र.२०६/पापु.०७, दि. ३० ऑक्टोबर, १९९८

प्रस्तावना:-

राज्यात लोकसभा, विधानसभा व विधानपरिषद यांच्या निवडणूकीच्या वेळी निवडणूक आयोगाची आचारसंहिता लागू झाल्यानंतर निवडणूक आयोगाच्या सहमतीने पाणी पुरवठा योजनेच्या कामांना आचारसंहितेतून सूट देण्यात आल्याबाबतचे निर्देश संदर्भाधीन दिनांक ८ मे, १९९६ च्या पत्रान्वये निर्गमित करण्यात आले आहेत. तसेच, राज्य निवडणूक आयोगाची आचारसंहिता नगरपालिका, जिल्हापरिषद वा ग्रामपंचायत यांच्या निवडणूकीच्या संदर्भात लागू झाल्यानंतर आचारसंहितेतून पाणी पुरवठा योजना राबविण्याकरिता काही विशिष्ट अटीच्या अधीन राहून सूट देण्यात आल्याचे संदर्भाधीन दिनांक ३० सप्टेंबर, १९९६ च्या पत्रान्वये

निवडणूकीच्या काळात आचारसंहिता लागू झाल्यानंतर स्थानिक संस्थांमधील तदनुषंगिक इतर सर्व अधिकार संपूर्णपणे उपयोगात आणण्याबाबत मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद हे सक्षम राहतील असे संदर्भाधीन दिनांक १३ फेब्रुवारी १९९७ च्या अधिसूचनेन्वये कळविण्यात आले आहे. वरील सर्व सूचनांचा एकत्रितपणे विचार करुन यासंदर्भात एकत्रित आदेश सुध्दा दिनांक ३० ऑक्टोबर, १९९८ च्या परिपत्रकान्वये निर्गमित केले आहेत.

जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने कार्यान्वित असलेला जलस्वराज्य प्रकल्प कार्यान्वित झाला आहे. सदर प्रकल्पाची व पिण्याच्या पाणी पुरवठा योजनांची अंमलबजावणी निवडणूक आचारसंहिता कालावधीत करण्याबाबतची आवश्यकता विचारात घेवून खालीलप्रमाणे एकत्रित आदेश निर्गमित करण्यात येत आहेत.

परिपत्रक:-

राज्यामध्ये लोकसभा, विधानसभा किंवा कुठल्याही स्थानिक प्राधिकरणाच्या निवडणूकीच्या आचारसंहिता कालावधीत पिण्याच्या पाणी पुरवठयाची **खालील कामे करता येतील:-**

१) बाहय अर्थसहाय्य प्रकल्पाची अंमलबजावणी करता येईल.
२) जागतिक बँक अर्थसहाय्यित जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत निवड झालेल्या गावांना योजनेचा लाभ देता येईल.
३) जलस्वराज्य प्रकल्पांतर्गत योजनांच्या अंमलबजावणी करिता ग्रामसभा घेणे, विविध समित्या स्थापन करणे, निवड झालेल्या गावांना अनुदान मंजूर करणे, प्रशिक्षण, विविध ज्ञान, कौशल्ये, तंत्रे विकसित करणे.इत्यादी कामे हाती घेता येतील.
४) नैसर्गिक आपत्ती, टंचाई निवारणार्थ पिण्याच्या पाण्याच्या टंचाई कार्यक्रमांतर्गत ज्या उपाय योजनांची आवश्यकता असेल त्या उपाययोजना घेता येतील.
५) पाणी पुरवठा योजनांची नियमित/ सर्वसाधारण स्वरुपाची दुरुस्तीची कामे घेता येतील.
६) निवडणूक आचारसंहिता लागू होण्यापूर्वी मंजूर झालेल्या योजनांची कामे पुढे चालू ठेवता येतील.

७) पाणी पुरवठा योजनेच्या संदर्भात कार्यक्रम अंमलबजावणीसाठी आवश्यक असलेली सर्व कामे, उदा. योजनांना मंजूरी देणे, निविदामागविणे, त्या अंतिम करणे, कामाचे कार्यान्वयन आदेश देणे व साहित्य खरेदी करणे इत्यादी कामे करता येतील.

**मात्र वरील कामे करताना खालील बाबींचे पालन करण्यात यावे.**

१) पिण्याचे पाणी पुरवठा कामासंबंधात भूमिपूजन करण्यासारखे किंवा समारंभ करण्यासारखे सार्वजनिक कार्यक्रम आयोजित करण्यात येऊ नयेत.

२) अशा कामांना किंवा समारंभांना निवडणूक आचारसंहिता कालावधीत कोणत्याही प्रकारची प्रसिध्दी देण्यात येऊ नये.

३) योजनांच्या कामाच्या प्रक्रियेत अशासकीय सदस्यांचा कोणत्याही प्रकारचा सहभाग घेण्यात येऊ नये.

२. लोकसभा किंवा विधानसभेच्या किंवा कुठल्याही स्थानिक प्राधिकरणांच्या निवडणूकीच्या काळात आचारसंहिता लागू झाल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांना ज्लिहा परिषदांकडून घेण्यात येणाऱ्या पाणी पुरवठा योजनेच्या कामाच्या संदर्भात सर्व वित्तिय व तदनुषंगाने इतर सर्व अधिकार उपयोगात आणता येतील. अशा निवडणूकीच्या आचारसंहितेचा कालावधी संपल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हापरिषद यांनी निवडणूक आचारसंहितेच्या कालावधीत या संदर्भात केलेल्या कार्यवाहीचा अहवाल तिच्या संपूर्ण कारणासहीत सक्षम प्राधिकरणाकडे सादर करणे बंधनकारक राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

**( उल्हास भोईटे)**
**उप सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रति,**

१) विभागीय आयुक्त (सर्व)

२) सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, एक्सप्रेस टॉवर्स, नरिमन पॉईंट, मुंबई.

३) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पुणे



C:\C Data\ws०७\Election rules.doc

४) जिल्हा अधिकारी (सर्व)
५) जिल्हापरिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी (सर्व)
६) मुख्य अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
७) अधीक्षक अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
८) प्रकल्प व्यवस्थापक, सुधांरणा सहाय्य व प्रकल्प व्यवस्थापन कक्ष, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, दुसरा मजला, सिडको भवन, बेलापूर, नवी मुंबई.
९) कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण (सर्व)
१०) कार्यकारी अभियंता, पाणी पुरवठा विभाग, जिल्हापरिषद (सर्व)
११) उप अभियंता, पाणी पुरवठा व स्वच्छता उप विभाग, जिल्हापरिषद (सर्व)
१२) मुख्य प्रशासकीय अधिकारी, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई.
१३) उप संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा, पूणे.
१४) वरिष्ठ भूवैज्ञानिक, भूजल सर्वेक्षणं व विकास यंत्रणा, (सर्व)
१५) महालेखापाल, महाराष्ट्र-१, मुंबई (लेखा परिक्षा/लेखा व अनुज्ञेयता)
१६) जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१७) मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई.
१८) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
१९) पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील सर्व नियंत्रण व कार्यासन अधिकारी.
२०) वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प १६)
२१) नियोजन विभाग
२२) निवड नस्ती

प्रत माहितीसाठी
१) मा.मंत्री , पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
२) मा.राज्यमंत्री, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे खाजगी सचिव
३) प्रधान सचिव, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग यांचे स्वीय सहाय्यक.